**सायबर सेल, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड, प्रेमलोक पार्क,
चिंचवड, पुणे दुरध्वनी क्रंमाक ०२०-२७३५०१२०


प्रेसनोट    पिंपरी चिंचवड ,दिनांक - १०/०९/२०२४

**बनावट शेअर ट्रेडिंग ॲप मध्ये पैसे गुंतवणुक करण्यास लावुन जास्तीचा नफा मिळुन देण्याचे आमिष दाखवुन आर्थिक फसवणुक करणा-या छत्रपती संभाजीनगर येथिल टोळीला पिंपरी चिंचवड सायबर सेलकडुन अटक.**

माहे जुलै २०२४ मध्ये हिंजवडी येथे राहणारे तक्रारदार यांना फेसबुक पाहत असताना ट्रेडींग बाबतचे Official Stocka या नावाची जाहिरात आली होती. सदर जाहिरीतीमधील लिंक इसमाने क्लिक केली असता, त्यांना एका व्हाटस्ॲप ग्रुपवर जॉईन करण्यात आले. सदर व्हाटस्ॲप ग्रुपवरुन आरोपी याने सदर तक्रार इसमास Kotakzer लिंक पाठवून ती डाऊनलोड करण्यास सांगितली. Kotakzer या ॲपवरून त्या ॲपमार्फत शेअर ट्रेडींग मध्ये गुंतवणूक करण्याचे व त्या माध्यमातुन चांगला परतावा देण्याचा आमिष दाखवून त्यांचा विश्वास संपादन करुन वेगवेगळया बँक अकाऊंट वरील एकुण रु.७४,००,०००/- भरण्यास भाग पाडले. सदरची रक्कम फिर्यादी यांनी परत काढण्याचा प्रयत्न केला असता, सदरची रक्कम काढता आली नाही. त्यावेळेस त्यांची आर्थिक फसवणुक झाल्याचे लक्ष्यात आल्याने त्यांनी प्रथम ऑनलाइन तक्रार देवून हिंजवडी पोलीस स्टेशन येथे संबंधीतविरुध्द तक्रार दिल्याने गु.र.नं. १००७/२०२४ भा.न्या.संहिता २०२३ चे कलम ३१८(४), ३१६(२) सह आय.टी. ॲक्ट कलम ६६(सी), ६६(डी)अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयांचा सायबर सेल मार्फत वरिष्ठांच्या आदेशान्वये समांतर तपास चालु असताना, संबधीत आरोपी यांनी गुन्हा करण्यासाठी वापलेले बँक अकाऊंट नंबरबाबत तांत्रीक विश्लेषन केले असता, त्यामधील आरोपी हे छत्रपती संभाजीनगर या भागात असल्याची माहीती प्राप्त झाली. त्यावरुन तात्काळ वरिष्ठांची परवाणगी घेवून ,पोनि रविकिरण नाळे, सहा.पोलीस निरीक्षक प्रविण स्वामी, यांनी पोउपनि सागर पोमण व स्टाफ यांना छत्रपती संभाजीनगर येथे रवाना केले. त्यानंतर सदर पथकाने तांत्रीक विश्लेषण व कैाशल्यपुरक तपास करुन अकाऊंट धारक आरोपी यांचा शोध घेवून १) साजिद शहा कासम शहा, वय-३० वर्षे, धंदा - मोबाईल एक्सेसरीज दुकान रा. जसवंतपुरा, नेहरुनगर, डिकाशन हॉटेल लेन, औरंगाबाद २) अभिजित रामराव श्रीरामे, वय -३२ वर्षे, रा. मयुरपार्क सी-४ बिल्डिंगसमोर, हरसुल, औरंगाबाद यांना ताब्यात घेतले व सायबर सेल पिंपरी चिंचवड येथे आणले असता, त्यानी सदर गुन्हयाची त्यांच्याकडे कैाशल्यपुरक तपास केले असता, त्यानी सदर गुन्हा केल्याचे निष्पण झाले आहे. त्यांच्याकडून दाखल गुन्हयातील ०३ मोबाईल फोन इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. व आरोपींकडुन प्राप्त बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रं - ६०५००४५०३४१ वर एनसीसीआर पोर्टलवर ५६ तक्रारी अर्ज दाखल असून, त्यांच अकाऊंट मध्ये रु. ४,००,००,०००/- चे व्यवहार झाल्याचे दिसून येत आहे.

सदर गुन्हयातील आरोपीकडे अधिक चौकशी केली असता, त्यांनी दिलेल्या माहितीचे आधारे अधिक साथीदार असल्याचे निष्पण झालेले असून, त्यांचा शोध चालु आहे.पुढील अधिक तपासकामी आरोपी यांना हिंजवडी पोलीस स्टेशन यांचे ताब्यात दिले आहे.

सदरची कारवाई मा.विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. शशिकांत महावरकर, सह पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. संदिप डोईफोडे पोलीस उपआयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड, मा.विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि रविकिरण नाळे, सपोनि प्रविण स्वामी, पोलीस उपनिरीक्षक सागर पोमण, पोहवा. दिपक भोसले, पोशि अतुल लोखंडे, मपोशि प्रिया वसावे, पोशि अशोक जावरे, पोशि श्रीकांत कबुले, पोशि अभिजीत उकीरडे (सर्व नेमणुक सायबर सेल) यांच्या पथकाने केली आहे.

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,
पिंपरी चिंचवड.